सकाळ अॅग्रोवन ११
रविवार, २० सप्टेंबर २०२६

# गुलाबावर ब्लॅक वाइन थ्रीप्सची नोंद



छायाचित्रांद्वारे पीक संरक्षण

रवींद्र पालकर

वाढते तापमान आणि पोषक वातावरणामुळे सध्या पिकांमध्ये फुलकिडींचा प्रादुर्भाव वाढला आहे. गुलाबावरही विविध फुलकिडी आढळतात. यंदा ब्लॅक वाइन थ्रीप्स या किडीचा प्रादुर्भाव गुलाबावर प्रकर्षाने दिसून येत आहे. या किडीची सविस्तर शास्त्रीय ओळख करून घेणे महत्त्वाचे ठरणार आहे.

ब्लॅक वाइन थ्रिप्स या नावाने ओळखली जाणारी फुलकीड पानांतील रस शोषून पिकाचे नुकसान करते. प्रादुर्भावामुळे पानांवर फिकटपणा व चट्टे दिसून येतात आणि पीक वाढीवर परिणाम होतो.

- किडीचे सामान्य नाव : द्राक्षावरील काळी फुलकीड (Black vine thrips)
- **शास्त्रीय नाव : *रेटिथ्रूप्स सिरिअॅकस* *(Retithrips syriacus)***
- गण (Order) : थायसॅनोप्टेरा (Thysanoptera)
- कूळ (Family) : थ्रिपिडी (Thripidae)
- नुकसानकारक अवस्था : अळी व प्रौढ.
- यजमान पिके व वनस्पती : बहुभक्षी कीड. द्राक्ष, गुलाब कपाशी, एरंडी, पेरू, निलगिरी आदी ५० हून अधिक पिके व वनस्पतींवर किडीची नोंद.
- नुकसानकारक अवस्था : अळी व प्रौढ

## ओळख

अंडी अवस्था : प्रति मादी ४० ते ६० या प्रमाणात गुलाबाच्या पानांच्या उतींमध्ये, प्रामुख्याने पानाच्या बाह्य त्वचेखाली अंडी घालते. अंडी घातलेल्या जागेवर विष्ठेचा अपारदर्शक द्रवाचा थर दिसून येतो.



किडीची पहिली अवस्था (पहिली इन्स्टार)



दुसरी इन्स्टार



पूर्वकोष अवस्था



किडीचा प्रौढ



कोष अवस्था

(सर्व छायाचित्रे : रवींद्र पालकर)

## किडीच्या अवस्था

- अळी- नवजात अळी सुरुवातीला पारदर्शक असून, पुढे पिवळसर-केशरी ते लालसर रंगाची होते. लांबी ०.३५ ते १.३० मि.मी. असते. उदराच्या टोकावर विष्ठेचा थेंब दिसून येतो.
- कोष- दुसरी अळी अवस्था पूर्ण झाल्यानंतर पूर्वकोष पानाच्या खालील बाजूस, शिरेलगत किंवा कोपऱ्यात आढळतो. या अवस्थेत अन्नग्रहण होत नाही. शरीर लालसर, डोके व पाय पिवळसर असून पंखांच्या कळ्या विकसित होतात. लांबी १.१० ते १.१५ मि.मी. व रुंदी सुमारे ०.५० मि.मी. असते. कोष पूर्वकोषासारखाच दिसतो; मात्र संयुक्त डोळ्यांतील सूक्ष्म नेत्रक (facets) स्पष्ट असतो. स्पर्शिका मागे व डोक्याला लागून असतात. पंखांच्या कळ्या उदराच्या जवळपास अर्ध्या भागापर्यंत वाढलेल्या असतात. शरीरावरील रोम (setae) स्पष्ट दिसतात. कोष तेजस्वी लालसर, डोके व पाय पिवळसर आणि पंखांच्या कळ्या फिकट तपकिरी असतात. कोषाची लांबी १.१० ते १.३५ मि.मी. व रुंदी सुमारे ०.५० मि.मी. असते.
- प्रौढ- प्रौढ फुलकीड लहान, सडपातळ व काळ्या रंगाचा असून पंख फिकट व त्यावर गडद ठिपके दिसतात. शरीराची लांबी १.३ ते १.५ मि.मी. असते. नर मादीपेक्षा लहान व सडपातळ असतो. मादी तुलनेने मोठी व भरदार असते. प्रौढांची उडण्याची क्षमता कमी असते.



रसशोषणामुळे दिसणारे चंदेरी ठिपके व व्रण.



तीव्र प्रादुर्भावामुळे पाने चंदेरी-रुपेरी व निस्तेज दिसतात.

## जीवनक्रम

किडीचा जीवनक्रम अंडी, अळी, पूर्वकोष, कोष व प्रौढ या अवस्थांतून पूर्ण होतो. अंडी ४ ते ५ दिवसांत उबतात. अळीच्या दोन अवस्था ७ ते ९ दिवसांत, पूर्वकोष अवस्था सुमारे एक दिवसात तर कोष अवस्था २ ते ३ दिवसांत पूर्ण होते. प्रौढ कीड १० ते २० दिवस जगते. अनुकूल परिस्थितीत संपूर्ण जीवनक्रम साधारण २४ ते ३७ दिवसांत पूर्ण होतो.

## पोषक वातावरण

उष्ण व तुलनेने कोरडे हवामान, कमी पाऊस व मध्यम सापेक्ष आर्द्रता हे हवामान किडीच्या प्रादुर्भावास पोषक ठरते.

## नुकसान

अळी व प्रौढ फुलकिडे गुलाबाच्या पानांवर राहून पानातील पेशींतील रस शोषतात. त्यामुळे पानांवर सुरुवातीला सूक्ष्म चंदेरी ठिपके व व्रण दिसतात. प्रादुर्भाव वाढल्यास हे ठिपके एकत्र येऊन पाने चंदेरी-रुपेरी व निस्तेज दिसू लागतात. प्रादुर्भावग्रस्त भागावर काळ्या विष्ठेचे ठिपके दिसून येतात. तीव्र प्रादुर्भावामुळे पाने आकसून वाळतात व गळून पडतात. परिणामी प्रकाशसंश्लेषणाची कार्यक्षमता कमी होऊन झाडाची वाढ व फुलांची गुणवत्ता घटते.

## नियंत्रण

- शेतातील तणनियंत्रण करावे.
- नत्रयुक्त खतांचा संतुलित वापर करावा.
- निळ्या चिकट सापळ्यांचा वापर करून किडीचे नियमित सर्वेक्षण करावे.
- मित्रकीटकांचे संवर्धन करावे.
- रासायनिक उपाय (प्रमाण प्रति लिटर पाणी)
- डायमेथोएट (३० टक्के ईसी) २.६४ मि.लि. (लेबल क्लेम आहे.)

**रवींद्र पालकर** ८८८८४०६५२२
(पीएच. डी. स्कॉलर, कीटकशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)